# आरोग्य विभाग, जिल्हा परिषद औरंगाबाद

आरोग्य विभाग

Email ID : dhoaurangabad@rediffmail.com
Phone No : 0240-2350744

जा.क्र./जिपऔ/आरोग्य/ /२०१७
कार्यालय, आरोग्य विभाग, जि.प.औरंगाबाद
दिनांक २७ / ६/२०१७

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन


## सामंजस्य करार

**विषय :-** **औरंगाबाद जिल्हातील ग्रामीण भागामध्ये, महिलांसाठी मोफत रोग निदान व उपचार कार्यक्रम सन २०१७ ते २०२० पर्यंत राबविणे बाबत.**

**संदर्भ :** दिनांक २०/०३/२०१७ रोजी GeBBS Foundation, India यांनी दिलेले पत्र

उपरोक्त नमुद विषयान्वये औरंगाबाद जिल्हयातील ग्रामीण भागातील महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी व रोगनिदान सन २०१७ ते २०२० पर्यंत राबविण्यासाठी **आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद, व महात्मा गांधी मिशन मेडीकल कॉलेज, औरंगाबाद** व **GeBBS Foundation, India** यांच्या सयुक्त विद्यमाने करण्यासाठी जि.प. आरोग्य विभाग यांच्या वतीने परवानगी देण्यात येत आहे.

या उपक्रमाद्वारे ग्रामीण, दुर्गम, डोंगरी व दळणवळणाची साधणे नसणाऱ्या गाव, उपकेंद्र किंवा प्राथमिक आरोग्य केंद्राचे ठिकाणी महिलांची सर्वांगिन आरोग्य तपासणी व्हावी, तसेच गंभीर आजारांची लक्षणे शोधुन वेळीच रोगनिदान व उपचार व्हावे या हेतुने **महिला आरोग्य सशक्तीकरण व संवर्धन** **“*Mahila Arogya Sashaktikaran & Sanvardhan*” (MASS)** कार्यक्रम राबविण्याचे ठरले.

या नाविन्यपुर्ण अभिनव उपक्रमामध्ये रोगनिदान झालेल्या महिला रुग्णांना मोफत उपचाराची सुविधा एम.जी.एम. वैदयकिय महाविद्यालय, औरंगाबाद येथे GeBBS Foundation, India च्या मदतीने करण्यात येईल. हा समाजाभिमूख उपक्रम आरोग्य विभाग, जि.प., औरंगाबाद, एम.जी.एम. वैदयकिय महाविदयालय, औरंगाबाद आणि GeBBS Foundation, India यांच्या संयुक्त सहभागाने राबविण्यात येईल.

करीता वरीलप्रमाणे सामंजस्य करार करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **श्री विजय सिंघ ठाकोर**<br>अध्यक्ष,<br>GeBBS Foundation,India | **डॉ राजेंद्र बोहरा**<br>अधिष्ठाता,<br>एम.जी.एम. वैदयकिय महाविदयालय, औरंगाबाद | **डॉ विवेक खतगांवकर**<br>जिल्हा आरोग्य अधिकारी,<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | **श्री मधुकर राजे अर्दड**<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद |

MGM's Medical College, Aurangabad

# महिला आरोग्य सशक्तीकरण आणि संवर्धन

**"Mahila Arogya Sashaktikaran & Sanvardhan" (MASS)**

**महिला आरोग्य संवर्धन कार्यक्रम राबविण्यासाठी खालीलप्रमाणे समिती स्थापन गठीत करण्याचे अनुषंगाने प्रस्ताव :**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी | - | समिती अध्यक्ष |
| २. | एम.जी.एम. संस्था प्रतिनिधी | - | समिती सदस्य |
| ३. | G.E.B.B.S. Foundation, India प्रतिनिधी | - | समिती सदस्य |
| ४. | नोडल अधिकारी (एम.जी.एम.) (MAS) | - | समिती सदस्य |
| ५. | नोडल अधिकारी,(साथरोग वैद्यकिय अधिकारी,आरोग्य विभाग,जि.प.) | - | समिती सदस्य |
| ६. | जिल्हा आरोग्य अधिकारी | - | समिती सदस्य सचिव |

**महिला आरोग्य संवर्धन कार्यक्रमात अंतर्भुत बाबी :**

- आशा स्वयंसेविकांद्वारे घरोघरी जावून महिलांचे सर्वेक्षण करणे - मानधन
- सर्वेक्षीत महिलांची आरोग्य तपासणी करीता शिबीरांचे आयोजन
- आरोग्य तपासणी अंतर्गत महिलांच्या रोगनिदान चाचण्या
- पुढील उपचार(संदर्भ सेवा),तपासणी, पुनर्भेट तपासणीसाठी आरोग्य तपासणी कार्डचे वाटप
- संदर्भसेवेकरीता वाहन व्यवस्था
- मोफत तपासणी व औषधोपचार
- अहवाल संकलन,पृथक्करण व सादरीकरण (एम.जी.एम.,गीब्स,आरोग्य विभाग,जि.प.)
- आंतररुग्णांची निवास व भोजन व्यवस्था.

**महिला आरोग्य संवर्धन कार्यप्रणाली :**

1 **आशा गृहभेट :**
आशा स्वयंसेविकांमार्फत गृहभेटीद्वारे महिलाच्या आजाराची माहिती संकलन

2 **गटप्रवर्तक :**
आशा स्वयंसेविकांमार्फत प्राप्त अहवालांचे संकलन व वैद्यकिय अधिकारी यांना सादरीकरण

3 **वैद्यकिय अधिकारी :**
आशा स्वयंसेविकांमार्फत प्राप्त अहवालांची पडताळणी करुन जिल्हा नोडल अधिकारी (जि.प.) यांचेकडे विस्तृत अहवाल सादरीकरण

4 **नोडल अधिकारी (जि.प) :**
वैद्यकिय अधिकारी यांचेमार्फत प्राप्त अहवालाविषयी नोडल अधिकारी (एम.जी.एम.)यांचेशी प्रत्यक्ष चर्चा करुन शिबिराचे ठिकाण,तारीख व वेळ ठरवतील.

5 **शिबिराचे आयोजन :**
शिबिराचे आयोजन करुन महिलांची तपासणी, रोगनिदान व संदर्भ सेवा

6 एम.जी.एम. नोडल अधिकारी (MAS) हे गीब्स संस्था व आरोग्य विभाग, जि.प.औरंगाबाद यांना बैठकीदरम्यान झालेल्या कामाचा अहवाल,सुचना,सुधारण याबात अवगत करतील.